# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १४७–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. चंद्रकांत महादेव पाटील,<br>मु. पो. हळ्ळी, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

चंद्रकांत महादेव पाटील, मु. पो. हळ्ळी, ता. जत, जि. सांगली यांनी घरगुती नवीन वीज पुरवठा मिळावा यासाठी दि. १.१२.२००९ रोजी वि.प.कडे अर्ज केला व त्यासोबत फी रु. २५/– मनीऑर्डरने पाठविली. परंतु त्यांना वि.प.कडून आजतागायत चलन मिळाले नाही. तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार क्र. ५७५ दि. १.१२.२००९ रोजी रितसर तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने आदेश क्र. १०८४२ दि. ४.१२.२००९ रोजी पारित केले.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर परिशिष्ट अ मध्ये दि. ६.७.२०१० रोजी दाखल करण्यात आली. मंचाकडून घरगुती वीज मागणीसाठी चलन मिळावे व विलंबापोटी भरपाई मिळावी अशी विनंती केली आहे. तक्रार प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत दाखल केली आहे.

वितरण कंपनीने आपले लेखी म्हणणे नोटीसीप्रमाणे दि. २६.७.२०१० ऐवजी २७.७.२०१० ला दाखल केले. त्यामध्ये तक्रारदाराचा अर्ज मिळाल्याचे मान्य केले व त्यांना वकर चलन देण्यात येईल असे म्हटले आहे.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. २८.७.२०१० ला सुनावणीस घेतली असतां, तक्रारदाराचे प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वि.प. तर्फे प्रभारी सहाय्यक अभियंता, संख उप विभाग श्री. मैंलापुरे व श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ विभाग उपस्थित. श्री. खापरे यांनी अर्ज केला आहे परंतु मुदतीत चलन दि नाही त्यामुळे एस.ओ.पी. प्रमाणे भरपाई मिळावी अशी मागणी केली. वि.प.तर्फे पी.आय. स्कीम बंद झाली आहे नवीन स्कीममध्ये दि. ३१.७.२०१० पर्यंत चलन देत आहे असे सांगितले व मंचासमोर तोंडी सांगितलेली बाब लेखी स्वरुपात ॲडिशनल से म्हणून कार्यकारी अभियंता श्री. भोसले यांच्या सहीने कंपनीकडे सध्या योग्य स्कीम उपलब्ध नसलेने दि. ३१.८.२०१० पर्यंत चलन देण्यात येईल असे लिहून दिले आहे. त्याप्रमाणे वि.प.कडून दि. ३१.७.२०१० रोजी चलन मिळाल्याचे प्रतिनिधीनी दि. २.८.२०१० ला पत्राने कळविले आहे. खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) तक्रारदार विलंबापोटी भरपाई मिळणेस पात्र आहे काय ?

उत्तर : होय

आदेश ?

खालील प्रमाणे

<u>कारणमिमांसा</u>

तक्रारदार यांच्या दि. १.१२.२००९ च्या अर्जाप्रमाणे त्यांना चलन देणे आवश्यक होते. परंतु वि.प.तर्फे सध्या कुठलीही स्कीम उपलब्ध नाही असे प्रतिपादन करण्यात आले व दि. ३१.७.२०१० पर्यंत चलन देण्याची लेखी हमी मंचासमोर देण्यात आली आहे. त्यामुळे तक्रारदाराची एक विनंती चलन मिळावे ही मंजूर करणेत येत आहे. विलंबाबाबत कृ ती मानके विनियमातील तरतुदीची पूर्तता करण्यात वि.प.ला अपयश आल्यास तक्रारदार यांस भरपाई मिळणेचा हक्क आहे व ती देण्याची वि.प.ची जबाबदारी आहे. तेव्हा दि.१.१.२०१० ते ३१.७.२०१० या चलन मिळण्याच्या तारखेपर्यंत २८ आठवड्यांच्या विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु. २८००/– तक्रारदारास देणे योग्य होईल. खालील प्रमाणे आदेश –

## <u>आदेश</u>

१) तक्रारदाराची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनीने लेखी हमी दिल्याप्रमाणे दि ३१.७.२०१० पर्यंत तक्रारदार यांस चलन द्यावे.

३) वि.प.ने दि. १.१.२०१० ते ३१.७.२०१० या काळातील विलंबाच्या २८ आठवड्यासाठी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु. २८००/– भरपाई तक्रारदारास द्यावी.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा(पूर्व),मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष